दर १५ मिनिटांनी राजाभाई टॉवर वरचे घड्याळ रस्त्यावरच्या रहदारीच्या गोंगाटापेक्षा वरच्या पटट्ीत टोल देते आणि खालच्या रस्त्यावरून घाईघाईने चालणाऱ्या पादचाऱ्यांच्या माना उंचावतात. राजाभाई टॉवर मुंबईतील फोर्ट विभागाच्या मध्यावर उभे आहे. फोर्ट म्हणजे युनेस्कोचा जागतिक वारसा ठरण्याची शक्यता असलेला मुंबईचा विभाग आहे.

फोर्ट विभागात एक मोठे अंडाकृती मैदान आहे. त्यास ओव्हल मैदान म्हणतात. खेळ व इतर मनोरंजनात्मक कार्यक्रमांसाठी वापरली जाणारी अशी ही सार्वजनिक जागा आहे. या मैदानाच्या एका बाजूला मुंबई विद्यापीठ, उच्च न्यायालय अशा १९ व्या शतकाच्या गॉथिक इमारती आहेत तर दुसऱ्या बाजूला २०व्या शतकाच्या, सुरूवातीच्या आर्ट डेको पद्धतीच्या निवासी इमारती आहेत.

वास्तुविद्या विशारदांचा एक गट, शहर रचनाकार व स्थानिक संघटना एकत्र येऊन कागदपत्रे सादर करून, व्हिक्टोरीया राणीच्या काळातल्या गॉथिक पद्धतीच्या इमारती आणि आधुनिक कलेनुसार सजलेल्या इमारती यांचे साकल्याने एकत्रित अवलोकन घडवणाऱ्या मुंबईतल्या या विभागातून युनेस्कोचे जागतिक वारसा ठिकाण ठरवले जावे असा विनंती अर्ज सादर करणार आहेत. महाराष्ट्र सरकारने याला पाठिंबा दिला आहे व आता ह्या प्रस्तावावर केंद्रिय सांस्कृतिक मंत्रालय विचार करणार आहे.

# मुंबईतील जुन्या बघण्याचा नवीन

— शानूर सिरवाई

(हा लेख "द वॉल स्ट्रीट जनरल" ०७-०९-२०१३, मासिकातील अंकामधुन लेखकाच्या परवानगीने पुर्नमुद्रीत व अनुवादीत केला आहे.)




छायाचित्राचे श्रेय : गुफ्रान शेख

# इमारतींकडे दृष्टिकोण

गुजरात मधील अहमदाबाद या ऐतिहासिक शहरातर्फे आलेला अर्ज व दिल्ली हे ऐतिहासिक वारसा असलेले शहर याबाबतचा अर्ज यांचाही विचार हे मंत्रालय करत असल्याचे श्रीमती आभा नारायण लाम्बा यांनी सांगितले आहे. श्रीमती आभा या पुराण वास्तुजतन विशारद असून गेली दहा वर्षे मुंबईच्या हया विभागास जागतिक वारसा असा दर्जा मिळावा यासाठी प्रयत्न करत आहेत. वरील तीन प्रस्तावांपैकी फक्त एक प्रस्ताव 'युनेस्को वर्ल्ड हॅरिटेज कमिटी' कडे पॅरीसला जानेवारी महिन्यात पाठवला जाईल.

"मुंबईच्या बाजूने फायद्याची गोष्ट म्हणजे आपल्या इमारती बऱ्याच अधिक प्रमाणात शाबूत आहेत. लूटीयन्स दिल्ली जशी पूर्वी होती तशी आहे, पण शाहजहाबाद मध्ये इतकी अतिक्रमणे व विकासाची कामे झाली आहेत की एकसंधपणा असा कुठे राहिलेलाच नाही." श्रीमती आभा म्हणतात की मुंबईच्या इमारती त्यांच्या बांधकामाच्या काळात जशा होत्या तशाच मूळ स्वरूपात आजही आहेत. 'आर्ट डेको' इमारतीची आतली सजावट सुद्धा यात अंतर्भूत आहे.

श्रीमती आभा लाम्बा मुंबईत १९९५ पासून राहत आहेत. त्या म्हणतात, ''गजबजलेले मध्यवर्ती ठिकाण आणि तेथे उत्तम दर्जाचे निओ गॉथिक बांधकाम तसेच आर्ट डेको इमारतींचा समुह देखील आहे असे एकत्रीकरण मुंबई व्यतिरिक्त जगात कोठेही आढळणार नाही.''

ब्रिटिशांनी १६६५ मध्ये मुंबईच्या सात बेटांवर ताबा मिळवला. नंतर त्यांनी या बेटांपैकी सर्वात मोठे बांधकाम जेथे होते ते डागडूजी करून दुरूस्त केले व त्याला ते मुंबईचा किल्ला म्हणू लागले. श्री. राहुल मेहरोत्रा हे वास्तुविशारद व कार्यकर्ता आहेत त्यांनी मुंबईवर अनेक पुस्तके लिहिली आहेत. ते म्हणतात ''जुन्या किल्ल्याच्या भिंती १८६० मध्ये तोडल्या व निओ गॉथिक प्रकारच्या भिंती त्या जागी बांधल्या.''

ते पुढे म्हणतात, ''ही घटना म्हणजे मुंबईला जागतिक पातळीवरील शक्ती म्हणून शिक्का मोर्तब करण्याच्या महत्त्वाकांक्षेचे प्रतिक व या बदलाचे निर्णायक वळण ठरले'' २०व्या शतकाच्या सुरुवातीच्या भारतीय वास्तुविशारदांची युरोप मधून परत येणारी नवी पिढी कार्यरत झाली आणि त्यांनी कालखंडात 'आर्ट डेको' पद्धतीच्या इमारती बांधल्या. यासाठी त्यांनी 'पोलादाच्या सळयांनी अधिक बळकट बनवलेले कॉँक्रीट' या सारख्या तंत्रज्ञानाचा प्रथमच वापर केला:'' श्री मेहेरोत्रा हे हॉर्वर्ड युनिव्हर्सिटीत शहर रचना, आखणी व योजना या विभागात प्राध्यापक आहेत.

श्रीमती आभा लाम्बा म्हणतात की, ''व्हिक्टोरियन गॉथिक व आर्ट डेको या दोन्ही वास्तूरचना प्रकारांनी भारतीय आवडी निवडी व प्रभाव आत्मसात केले आहेत. निओ गॉथिक इंडो गॉथिक झाले आहे. येथील हवामानाच्या दृष्टीने सोयीस्कर ठरावे म्हणून उच्च न्यायालयाचे व्हरांडे रुंद व उघडे आहेत खिडक्या आकाराने खूप मोठ्या आहेत.''

त्या म्हणतात 'आर्ट डेको बांधकामामध्ये भारतीय आकार व आकृती रचना स्पष्टपणे जाणवतात बँक ऑफ इंडियाच्या इमारती मधील कमानी फत्तेपूर सिक्रीला आहेत तशाच दिसतात. भारतीय वास्तूशास्त्राने आर्ट डेकोची भाषा बदलवली त्यास अधिक समृद्ध बनवले व 'इंडो डेको' नावाची नवीन मिश्र शैली तयार केली.''

स्थानिक रहिवाशांनी संपूर्ण परिसराची एकतानता एकसंध राहावी म्हणून काम केले आहे. ''आमच्याकडे उंच उंच मनोरे बांधलेले नाहीत. प्रत्येक इमारत ही विशिष्ट हेतूने बांधली गेली. निवास स्थान, विश्वविद्यालय, न्यायालय सिनेमा गृह ही यादी चालूच राहील. हा जिवंत वारसा आहे.'' असे नयना कथपालीया म्हणतात. श्रीमती नयना एका आर्ट डेको इमारतीत वाढल्या व तेथेच सध्या राहतात. त्या ओव्हल ट्रस्ट'' नावाच्या ट्रस्टच्या विश्वस्त

आहेत. ही ट्रस्ट म्हणजे स्थानिक रहिवासी नागरिकांचा एक गट आहे. त्यांनी १९९९ मध्ये ओव्हल मैदानाची दुरुस्ती केली व या मैदानाच्या देखभालीची जबाबदारी त्यांच्यावर आहे. श्रीमती कथपालीयानी सांगितले की, ''१९९० च्या सुरुवातीच्या काळात विकासकामाचा दबाव सर्वप्रथम आणला गेला. ओव्हल मैदानात एक क्लब, शॉपिंग सेंटर व तळघरात जमिनीखाली वाहन तळ बांधण्याचा प्रस्ताव मांडला गेला पण रहिवाशांनी त्याला प्रखर विरोध केला'' त्या म्हणतात ''आम्ही येथे राहणारे सर्वजण मैदानाकडे प्रेमाने व अभिमानाने पाहतो आणि मग मनात विचार येतो की येथे इमारती बांधून आम्ही या अमूल्य मैदानाला पैशात कसे काय मोजू शकणार?''

जर हा विभाग जागतिक वारसा स्थळ म्हणून मान्य झाला तर रहिवाशांची अशी अपेक्षा आहे की त्यामुळे पुनर्विकासावर जी बंधने येणार त्याची भरपाई म्हणून काही तरी मिळायला हवे. ओव्हल कुपरेज रेसिडन्ट असोशिएशनचे अध्यक्ष अर्शद मेहता म्हणतात. ''सरकारने आमच्या प्रॉपर्टी टॅक्समध्ये काही सवलत देण्याचा विचार करावा किंवा आमच्या जुन्या इमारतींची डागडूजी करण्यासाठी सरकारने निधी द्यावा.''

युडीआरआय चे एक्सिक्युटीव्ह डायरेक्टर श्री. पंकज जोशी म्हणतात की, ''नागरिकांच्या विविध गटांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी व त्यांना नाव नोंदणी प्रक्रियेत सामिल करून घेण्यासाठी इन्स्टिट्यूटने तीन सभा घेतल्या व वारसा संभाळून ठेवण्याच्या योजनेची आखणी विकसित केली." श्री. जोशी पुढे म्हणाले की, इतर बदलांच्या जोडीने हा परिसर पादचारी अपंग व वृद्ध यांच्यासाठी सोयीस्कर बनवण्यासाठीही काही बदल करावे लागतील. युनेस्कोकडे नाव नोंदणी झाली तर मुंबईला वारसास्थळ म्हणून आणखी आगळे महत्त्व प्राप्त होईल. पर्यटन व्यवस्थापन व पर्यटकांचे आदरातिथ्य यामध्ये नोकरीच्या अधिक जागा उपलब्ध होतील.

कोणतेही शहर एकतर व्यापारी केंद्र तरी असते किंवा सांस्कृतिक केंद्र असते असा एक गैरसमज आपल्या भारतात आहे असे श्रीमती आभा लाम्बा सांगतात. यावर त्यांचे म्हणणे असे आहे की जर एखाद्या शहराला न्यूयार्क किंवा लंडन सारखी आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवायची असेल तर त्या शहराने या दोन्हीमध्ये समतोल साधायला हवा. एखादे शहर स्वच्छ केले गेले आणि रात्रीच्या वेळी चमचमणाऱ्या इमारती तेथे दिसू लागल्या तर तेथील व्यापारी वातावरण लगेचच उंचावते.

युनेस्कोच्या जागतिक वास्तुवारसा हक्क ठिकाणांपैकी दोन ठिकाणे मुंबईमध्ये पूर्वी पासूनच आहेत. पहिले ठिकाण म्हणजे एलीफंटा केव्हज या गुफांमध्ये शिव या हिंदू दैवताच्या पाषाण मूर्ती आहेत. दुसरे ठिकाण आहे छत्रपती शिवाजी टर्मिनस. हे स्टेशन गॉथिक रिव्हायवल पद्धतीने बांधलेले आहे. भारत ब्रिटिशांची वसाहत होती त्या काळाचे हे एक प्रतिक आहे. फोर्ट विभागातला वास्तुवारसा ठरवले तर ते तिसरे ठिकाण होईल व भारतातील जागतिक वारसा स्थळांपैकी जास्तीत जास्त स्थळे असलेले राज्य म्हणजे महाराष्ट्र राज्य ठरेल.

"आपला विभाग अनन्यसाधारण आहे (युनिक) व तो युनेस्कोकडे वास्तुवारसा म्हणून सुचवला जाऊ शकतो ही किती अभिमानाची गोष्ट आहे आणि या अभिमानामुळेच लोक मुंबईतील भव्य इमारतीचे कौतुक करू लागले आहेत. असे श्री. मेहता म्हणतात. ''शहरातल्या काही थोड्या मोकळ्या मैदानांपैकी एक मोठे मैदान म्हणजे ओव्हल मैदान आणि ते रविवारी हजारो क्रिकेटपटू व प्रेक्षकांनी भरून जाते ह्या दृश्यापेक्षा अधिक अभिमानास्पद वाटेल अशी दुसरी गोष्ट असू शकेल काय? अशी जोड ते आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ देतात.